''स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत लोकप्रशासन विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा गोषवारा''.

संशोधन विषय

# "आदिवासी विकासात आदिवासी विकास प्रशासन विभागाची भूमिका: ठाणे जिल्हा एक अभ्यास."


: संशोधक :

बांगर नितीनकुमार बाबासाहेब

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग

अण्णासाहेब वर्तक मानव्य महाविद्यालय

वसई रोड (प.) जि. पालघर

: मार्गदर्शक :

डॉ. उत्तम इंगळे

सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख

लोकप्रशासन विभाग,

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी


जून २०१७

## “आदिवासी विकासात आदिवासी विकास प्रशासन विभागाची भूमिकाः ठाणे जिल्हा एक अभ्यास.”

### १) प्रस्तावना :

आदिवासी जमात ही जगाच्या बहुतेक सर्वच भागात अस्तित्वात आहेत. विशेषतः आशिया, आफ्रिका आणि अमेरिका या खंडामधील देशात आज ही आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणावर आढळतात. युरोपमध्ये मात्र झपाट्याने आधुनिकीकरण झाल्याने युरोपमध्ये आदिवासी जमात म्हणून ओळखणे कठीणप्राय झाले आहे. आदिवासींना विविध देशामध्ये वेगवेगळ्या नावानी संबोधले जाते जसे की अमेरिकेत त्यांना “रेड इंडियन्स”, ऑस्ट्रेलियात “ॲबोरिजीन्स” युरोपीय देशामध्ये “जीप्सी” तर आफ्रिका व आशियाई देशामध्ये “आदिवासी” या नावानी ओळखले जाते.

आफ्रिका खंडानंतर आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारतामध्ये आदिवासींना मूळ निवासी असे म्हटले जाते तर भारतीय राज्यघटनेमध्ये त्यांचा उल्लेख अनुसूचित जमाती असा केला जातो.

सन २०११ च्या जनगणनेचे प्राथमिक निष्कर्ष आधार मानता आदिवासींची प्रत्यक्ष लोकसंख्या विचारात घेता मध्यप्रदेशानंतर महाराष्ट्राचा देशात दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवासी जमाती असून २०११ च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या सुमारे १ कोटी ०५ लाख १० हजार २१३ इतकी असून राज्याच्या लोकसंख्येच्या तुलनेने हे प्रमाण ९.३५ टक्के इतके आहे.

### १.१ विकासाची संकल्पना

विकास ही एक लवचिक संकल्पना असून तिचा संबंध विविध क्षेत्राशी जोडला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या तज्ञांनी विकासाची संकल्पना सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय तसेच आर्थिक घटकांच्या सातत्याने वाढणाऱ्या आणि वेगवेगळ्या गरजांची पूर्तता करण्यासाठी देशाच्या प्रशासन आणि मूल्य पध्दतीच्या क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे विकास अशी केली आहे.

## १.२ आदिवासी विकासाची संकल्पना

आदिवासी विकासाबाबत विविध दृष्टीकोन असून त्यांच्या विविध समस्या सोडवून त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे अभिप्रेत आहे. आदिवासी भागातील ज्या अनेक समस्या आहेत जसे की – गरिबी, बेकारी, अज्ञान, अंधश्रध्दा, आरोग्य, शिक्षण, उद्योग, वाहतूक इत्यादी त्या दूर करून आदिवासी भागातील लोकांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक व इतर क्षेत्राचा विकास घडवून आणणे अभिप्रेत आहे. थोडक्यात आदिवासी विकासात आदिवासी भागाचा संपूर्ण विकास अभिप्रेत आहे.

## १.३ आदिवासी विकासात आदिवासी विकास प्रशासन विभागाची भूमिका:

आदिवासी विकासात आदिवासी विकास विभागाला महत्वाची भूमिका पार पाडावी लागत आहे. विकसनशील देशात अनेक समस्या असतात. साधन संपत्ती कमी असते. समाजात मागासलेपण आहे. समाजातील हे सर्व प्रश्न किंवा अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असते. विकासाच्या प्रक्रियेत सर्व बाजुस स्पर्श केला जातो. विकासात एकूण समाजाचे परिवर्तन सुध्दा अभिप्रेत आहे. विकसनशील देशात लोकसंख्या जास्त असते. बचत कमी, भांडवल कमी यामुळे गरीबीचे एक दृष्टचक्र चालू असते. लोक विकासासाठी प्रशासनावर अवलंबून असतात. एकंदरीत विकासाची सर्व कामे प्रशासनाला पार पाडावी लागतात.

१५ जानेवारी १९९२ पासून आदिवासी विकास विभागाची पुनर्रचना करण्यात आली असून सचिव, आदिवासी विभाग या उच्च श्रेणीच्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली या विभागाचे काम चालते. आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक या दोन संस्था तसेच आदिवासी आयुक्तालय, नाशिक ही प्रशासकीय संरचना यांवर आदिवासी विकास विभागाच्या कार्यात चार अतिरिक्त आदिवासी आयुक्त व त्यांच्या नियंत्रणाखाली हे प्रकल्प अधिकारी आदिवासी आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी विकासाची कामे करीत आहेत.

सध्या ठाणे अतिरिक्त आदिवासी विकास आयुक्तालयाच्या अधिनिस्थ सात एकात्मिक विकास प्रकल्प अधिकारी असून ठाणे जिल्ह्यासाठी शहापूर, जव्हार व डहाणू या तीन ठिकाणी एकात्मिक विकास प्रकल्प अधिकाऱ्याची कार्यालये असून या कार्यालयामार्फत आदिवासी विकास घडवून आणला जात आहे.

## १.४ आदिवासी विकासाच्या योजना :—

आदिवासीचा विकास घडवून आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून वेगवेगळ्या प्रकारच्या विकास आणि कल्याणकारी योजना राबविल्या जातात व त्यामार्फत आदिवासींचा विकास घडवून आणण्याचे कार्य पार पाडले जाते.

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या वतीने अनेक योजना व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. आदिवासी उप—योजना (Tribal sub-plan) ही आदिवासीच्या विकासासाठी राबविण्यात येणारी अत्यंत महत्वाची योजना आहे. ज्या गावामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त आदिवासी असतील अशा गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये (Integrated Tribal Development projects) करण्यात आला तर ५० टक्के पेक्षा कमी लोकसंख्येच्या गावांचा समावेश याच प्रकल्पामध्ये करण्यात आला मात्र अशी क्षेत्र अतिरिक्त एकात्मिक आदिवासी विकास क्षेत्र (Additional Integrated Tribal Development projects)म्हणून ओळखण्यात येऊ लागली व त्यामार्फत आदिवासीचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय राज्य घटनेच्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरून राज्याने समाजातील शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या विशेष करून अनुसूचित जाती—जमातीच्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून आदिवासी क्षेत्र उपयोजना आखण्यात आली आहे. याशिवाय आदिवासी लोक उपयोजनेच्या फायद्यापासून वंचित राहू नयेत यासाठी माडा: सुधारित क्षेत्र विकास खंड (Modified Area Developement Apporoach: MADA) आणि मिनी माडा: लघु सुधारित क्षेत्र विकास खंड (MINI MADA) क्षेत्रे तयार करण्यात आली आहेत. राज्यात सध्या ४३ माडा: आणि २४ मिनी माडा: क्षेत्रे आहेत तर उपयोजना क्षेत्रात एकूण २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यरत आहेत.

## १.५ आदिवासीच्या समस्या

वाहतुकीच्या गैरसोयी, स्वच्छ व पुरेशा पिण्याच्या पाण्याचा तुटवडा, सावकार व जमीनदार यांच्याकडून होणारी पिळवणूक, मध्यस्थ व दलाल यांच्याकडून होणारे आर्थिक

शोषण, वेठबिगारी, अज्ञान, निरक्षरता व अंधश्रद्धा, अनारोग्य व प्राथमिक आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचा अभाव, व्यसनाधीनतेमुळे बहुतांश आदिवासी समाज अतिशय दयनीय अवस्थेत जीवन कंठीत आहे. अशा परिस्थितीत दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता, आर्थिक शोषण, बेकारी व कुपोषण हे त्यांचे प्रश्न महत्वाचे ठरतात. या विविध समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेला आर्थिकदृष्टया सक्षम करून, त्यांना जास्त अधिकार देऊन त्यांच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती वाढवून आदिवासींच्या अडचणी खऱ्या अर्थाने सोडविता येतील.

## २) संशोधन समस्या

महाराष्ट्र शासनाच्या विविध आदिवासी योजनांचा आदिवासींना होणाऱ्या लाभांचा अभ्यास केला जाणार आहे. या योजनामुळे आदिवासींच्या समस्या कमी झाल्या आहेत का याचा अभ्यास केला जाणार आहे. त्यासाठी सदर विषयाची अभ्यासासाठी निवड करण्यात आली आहे.

## ३) संशोधन विषयाचे महत्व :–

ठाणे हे जिल्ह्याचे ठिकाण असून महाराष्ट्राची राजधानी मुंबई पासून सुमारे ४० किमी अंतरावर आहे. ठाणे शहराला फार मोठी ऐतिहासिक, राजकीय व सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. भौगोलिक दृष्ट्या ठाण्याची रचना आगळ्यावेगळ्या स्वरूपाची आहे.

सागरी, डोंगरी व नागरी अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना ठाणे जिल्ह्याला लाभली आहे. ठाण्यामध्ये एकूण १५ तालुक्याचा समावेश होतो. नागरी वैशिष्ट्यंचा विचार करता ठाणे जिल्ह्यात ६ महानगर पालिका, २ नगर पालिका, सिडको, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आदी नियोजन प्राधिकरण असलेला ठाणे हा राज्यातील एकमेव जिल्हा आहे. तसेच ठाणे हा राज्यातील सर्वाधिक महानगर पालिका असलेला जिल्हा गणला जातो.

नागरी भागाबरोबरच ठाणे जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या देखील मोठ्या प्रमाणात असल्याने ठाणे जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. यामध्ये महादेव कोळी, वारली, पारधी, ठाकर, मल्हार कोळी, भिल्ल व काथोडी इत्यादी जमातींचा समावेश असून त्यांचे जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण १४.७ टक्के इतके आहे. जिल्ह्यातील

आदिवासींचा विचार करता ठाणे जिल्ह्यातील आदिवासींना शासनाच्या विविध योजनांचा किती फायदा झाला आहे हे पाहणे संयुक्तिक वाटते.

## ४) संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) आदिवासी विकासासाठी कोणते औपचारिक कार्यक्रम व योजना राबविल्या गेल्या याची माहिती घेणे.

२) ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या समस्यांचा अभ्यास करणे.

३) आदिवासी विकासात आदिवासी विकास विभागाची भूमिका व कार्ये.

४) विविध योजनाचा आदिवासींना किती फायदा झाला आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी किती प्रमाणात झाली याचा शोध घेणे.

५) सध्या ठाणे आदिवासी विकास विभागाची आदिवासी विकासाची दिशा आणि भविष्यकाळासाठी कोणत्या रितीने प्रयत्न केले जात आहेत याची माहिती घेणे.

## ५) गृहितके

संशोधन विषयाची काही गृहितके निश्चित केली आहेत.

१. विकास योजनामुळे ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा सर्वागीण विकास झालेला आहे.

२. विकास योजनामुळे आदिवासीच्या सामाजिक,आर्थिक व राजकिय परिस्थितीत सुधारणा झाली आहे.

३. आदिवासींचा राहणीमानाचा दर्जा उंचविण्यासाठी योजना उपयुक्त आहेत.

## ६) संशोधन पध्दती

प्रस्तूत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोताच्या सहाय्याने तथ्यांचे संकलन करण्यात येणार आहे.

**६.१** प्रस्तूत शोधनिबंधामध्ये आदिवासी विकासासाठी सरकारकडून केल्या गेलेल्या व सध्या चालू असलेल्या योजना व कार्यक्रमांची माहिती घेण्यात येणार आहे यासाठी व्यष्टी अध्ययन पध्दतीचा अवलंब केला जाईल. प्राथमिक माहितीसाठी आदिवासी विकास प्रशासन विभागातील प्रकल्प अधिकारी व इतर पदाधिकारी वर्गाच्या मुलाखती घेतल्या जातील. या शिवाय

आदिवासी विकास विभागाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या शासकीय नोकरवर्गाशी संपर्क साधून माहितीचे संकलन करून त्याचे विश्लेषण केले जाईल. आदिवासी विकास विभागाचे अहवाल अंदाजपत्रके, हिशेब तपासणी अहवाल व इतर उपलब्ध माहितीचे विश्लेषण करणार आहे.

**६.२ दुय्यम साधन सामग्री**

दुय्यम माहितीसाठी प्रकाशित केलेली पुस्तके नियतकालिके शासनाच्या वेबसाईटस् आणि वृत्तपत्रातील प्रकाशित केलेल्या माहितीचा वापर केला जाईल.

**६.३ विश्लेषणात्मक तंत्रे**

तथ्यांचे संकलन करून त्याचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी, सरासरी, एकूणाशी प्रमाण, वृध्दीदर इत्यादीचा अवलंब केला जाणार आहे.

**७) शोध प्रबंधाची रूपरेषा**

**प्रकरण पहिले :— प्रस्तावना**

१. आदिवासी विकास संकल्पना

२. संशोधन पध्दती माहिती स्त्रोत व विश्लेषण तंत्रे

**प्रकरण दुसरे — ठाणे जिल्ह्याची सविस्तर माहिती**

प्रस्तूत प्रकरणामध्ये ठाणे जिल्ह्याची सविस्तर माहिती घेतली जाईल.

**प्रकरण तिसरे — ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या विकासासाठीची प्रशासकीय यंत्रणा**

प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासी विकास विभागाच्या प्रशासकीय यंत्रणेचा अभ्यास केला जाईल.

**प्रकरण चौथे — आदिवासी विकासाच्या विविध योजनांचा आढावा आणि अंमलबजावणी**

प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकासाच्या विविध योजनांचा आढावा ठाणे जिल्ह्याच्या संदर्भात घेतला जाईल.

**प्रकरण पाचवे – आदिवासीच्या प्रशासनाकडून अपेक्षा आणि त्यांच्या अंमलबजावणीतील अडथळे**

प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासीच्या विविध समस्यांचा आढावा घेतला जाईल आणि आदिवासींच्या प्रशासनाकडून अपेक्षांचा अभ्यास केला जाईल.

**प्रकरण सहावे – आदिवासींच्या विकासासाठीच्या प्रशासकीय यंत्रणेचे मूल्यमापन**

प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासींना योजनांचा कितपत फायदा झाला प्रशासकीय यंत्रणेच्या अडचणी आणि आदिवासींची उदासिनता यांचा अभ्यास करण्यात येईल.

**प्रकरण सातवे – निष्कर्ष आणि शिफारशी**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाचा अभ्यास करून त्यास अनुसरून निष्कर्ष काढले जातील व आदिवासी विकासास अनुसरून योग्य त्या शिफारशी सुचविल्या जातील.

**संदर्भ ग्रंथ :**


१) डॉ. मालती तेगमपुरे, आदिवासी विकास आणि वास्तव चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००९.

२) प्रभाकर मांडे, भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, जाने. २००३.

३) डॉ. सौ. शैलजा देवगांवकर व डॉ. शा. गो. देवगांवकर, आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन, नागपूर, २००१

४) दिपक गायकवाड, आदिवासी चळवळ स्वरूप व दिशा, सुगावा प्रकाशन, पुणे. २००५.

५) डॉ. चंद्रकांत पुरी, आदिम समाजाचा विकास, एक चिकित्सक अभ्यास, परम मित्र पब्लिकेशन्स, ठाणे. २०१०.

६) डॉ. गोविंद गारे, आदिवासींचे शिक्षण, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००९.

७) गुरुनाथ नाडगोडे, भारतीय आदिवासी, कोन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९.

८) डॉ. दाऊद दळवी, असे घडले ठाणे, श्रीकृपा प्रकाशन, नवी मुंबई, २०१०.

९) प्रा. डॉ. विजय अनंत कुलकर्णी, स्वातं चळवळीतील ठाणे, व्यास क्रियेशन्स, ठाणे,

२०१२.
१०) हरिभाऊ शेजवळ, श्रीस्थानक ठाणे, नवता बुक वर्ल्ड, मुंबई, २०१२ .
११) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका, सन २०११–१२.
१२) एम. एल. वाघमारे, पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ आणि आदिवासींचा विकास, समर्थ ऑफसेट, पुणे, २०११.

टिप : संशोधन आराखड्यात परिस्थितीनरूप बदल करण्यात येईल.

**संशोधक**
**बांगर नितीनकुमार बाबासाहेब**
सहाय्यक प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग
अण्णासाहेब वर्तक मानव्य महाविद्यालय,
वसई रोड (प.), जि. पालघर.

**मार्गदर्शक**
**डॉ. उत्तम इंगळे**
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख
लोकप्रशासन विभाग
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी